DAY —— 11 SEAT NUMBER | | | | | | |

| 2024 | VII | 30 | 1100 | J-210 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# BOOK KEEPING & ACCOUNTANCY (50)

**Time : 3 Hrs.** **(11 Pages)** **Max. Marks : 80**

**प्र. १. खालील सर्व उपप्रश्न सोडवा :** **[२०]**

**( अ )** खालील विधानांशी आपण सहमत आहात की असहमत ते सांगा : (५)

(१) कायदेशीर संगणक प्रणाली ही सुरक्षित कोणत्याही प्रतिबंधां शिवाय व पूर्णपणे कार्यान्वित प्रणाली अशी असते.

(२) विपत्राच्या निवर्तना प्रसंगी दिलेली सूट / कसर आहार्यीचे उत्पन्न असते.

(३) रोखीकरणावरील तोटा दिवाळखोर / नादार भागीदारांच्या भांडवल खात्याला स्थानांतरित केला जात नाही.

(४) नफा मिळविणे हा नफा न कमविणाऱ्या संस्थांचा हेतू होय.

(५) विद्यमान भारतीय भागीदारी कायदा १९४५ या वर्षी लागू केला गेला.

**( ब )** योग्य पर्यायाची निवड करून वाक्य पुन्हा लिहा : (५)

(१) मृत भागीदाराच्या भांडवल खात्यावरील शिल्लक ही ......... खात्याला स्थांनातरित केली जाते.

(अ) नातेवाईकांच्या

(ब) वारसदार कर्ज

(क) भागीदारांचे भांडवल

(ड) भागीदाराचे कर्ज

(२) संपत्तीच्या मूल्यात घट होते तेव्हा नफातोटा समायोजन खाते .......... केले जाते.

(अ) नावे

(ब) जमा

(क) अधिक

(ड) समान

(३) समायोजित भांडवलापेक्षा जास्त दिसणारे प्रत्यक्ष भांडवल ..........

(अ) समान भांडवल

(ब) अतिरिक्त भांडवल

(क) कमी भांडवल

(ड) लाभ

(४) चालू लेखा वर्षात (current year) आगाऊ मिळालेली वर्गणी हे एक .......... आहे.

(अ) उत्पन्न

(ब) खर्च

(क) संपत्ती

(ड) देयता

(५) जेव्हा भागीदारीच्या करारनाम्यात भागीदारांच्या नफा-तोटा विभाजन संबंधी उल्लेख नसतो तेव्हा भागीदार ......... अनुपातात नफा-तोटा वाटून घेतात.

(अ) समान

(ब) भांडवल

(क) प्रारंभिक योगदान

(ड) भागीदाराचा अनुभव आणि कार्यकाळ

**(क)** खालील विधानांसाठी प्रत्येकी एक योग्य शब्द / संज्ञा / शब्दसमूह लिहा : (५)

(१) रोख रकमेत ताबडतोब परावर्तित करता येऊ शकणारी संपत्ती.

(२) रोखीकरण खात्याची नावे शिल्लक.

(३) जुन्या भागीदारांना सामान्य निधीचे वाटप करावयाचे प्रमाण.

(४) नफा न कमविणाऱ्या संस्थेच्या एकूण संपत्तीचे एकूण देयतांवर असलेले आधिक्य.

(५) विक्रीवरील खर्च अंतिम लेख्यामध्ये कोणत्या खात्यात लिहिला जातो?

**(ड)** गटात न बसणारा शब्द ओळखा : (५)

(१) अधिमूल्य, कसर, सममूल्य, दलाली

(२) नोंदणी अधिकारी, आहर्ता, आहार्यी, आदाता

(३) इमारतीत वाढ, यंत्रात वाढ, उपस्करातील घट, प्राप्य विपत्रात वाढ

(४) वाढावा, तूट, शुद्ध नफा, भांडवल निधी

(५) आगत वाहन व्यय, पगार, अधिकार शुल्क, आयात शुल्क

**प्र. २.** सचिन आणि संतोष हे एका भागीदारीत अनुक्रमे ३ : १ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. ३१ मार्च, २०२० रोजी त्यांचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे – **[ १० ]**

**ताळेबंद**
**३१ मार्च, २०२० रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | ऋणको | १,६०,००० |
| सचिन | ३,००,००० | जमीन व इमारत | ८०,००० |
| संतोष | १,००,००० | मालसाठा | १,००,००० |
| सामान्य निधी | ४०,००० | फर्निचर | ५५,००० |
| धनको | २,००,००० | यंत्रसामग्री | १,५०,००० |
| देय विपत्र | ५०,००० | रोकड | २,००,००० |
| अधिकोष अधिविकर्ष | ५५,००० | | |
| | **७,४५,०००** | | **७,४५,०००** |

१ एप्रिल २०२० रोजी किशोरला खालील अटींवर भागीदारीत प्रवेश दिला :

(१) त्याने भविष्यातील होणाऱ्या लाभामध्ये ($\frac{१}{५}$) हिस्स्यासाठी भांडवल म्हणून ₹ १,००,००० आणि ख्यातीतील हिस्सा म्हणून ₹ ५०,००० आणावे.

(२) मालसाठ्याचे ५% आणि जमीन व इमारतीचे २०% वाढवावे.

(३) फर्निचर वर २०% घसारा आकारा.

(४) ऋणकोवर ५% दराने संशयित कर्ज निधीची तरतूद करावी.

(५) सर्व भागीदारांचे भांडवल खाते त्यांच्या नवीन नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात रोखीच्या माध्यमातून समायोजित करावी.

तयार करा :

(अ) नफा-तोटा समायोजन खाते

(ब) भागीदारांची भांडवल खाती

(क) नवीन भागीदारी संस्थाचे ताळेबंद

**किंवा**

अक्षद, आदित्य आणि आभा सम प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च, २०२२ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे होता :

**ताळेबंद**

**३१ मार्च, २०२२ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| धनको | ५०,५०० | यंत्र | | ५३,००० |
| राखीव निधी | २२,५०० | मालसाठा | | ३२,००० |
| देय विपत्र | १५,००० | प्राप्य विपत्र | | ४७,००० |
| भांडवल खाते : | | बँकेतील रोख | | २१,००० |
| अक्षद | ६५,००० | ऋणको | २८,००० | |

| | | | |
|---|---|---|---|
| आदित्य | ४०,००० | – बुडीत कर्ज निधी ३,००० | २५,००० |
| | | भांडवल खाते : | |
| | | आभा | १५,००० |
| | **१,९३,०००** | | **१,९३,०००** |

दिनांक ३१ मार्च, २०२२ या तारखेला भागीदारी संस्था विसर्जित करण्याचे ठरविले

(१) विविध संपत्तीचे रोखीकरण खालील प्रमाणे झाले :
मालसाठा ₹ ३१,०००
यंत्र ₹ ३९,५००
प्राप्य विपत्र ₹ ४१,०००
ऋणको ₹ २७,०००

(२) धनकोंना ₹ ५०० कसरीवर शोधन करण्यात आले आणि देय विपत्राचे पूर्ण पणे शोधन केले.

(३) रोखीकरण खर्च ₹ ६,६००

(४) आभा नादार झाली आणि तिच्या खाजगी संपत्तीतून सर्व मिळून केवळ ₹ ३,५०० वसूल झाले.

तयार करा :
(अ) रोखीकरण खाते
(ब) सर्व भागीदारांचे भांडवल खाते
(क) बँक खाते

**प्र. ३.** मीनू, रेणू आणि सोनू हे सम प्रमाणात नफा–तोटा विभागणारे भागीदार आहेत. त्यांचा ३१ मार्च, २०२१ रोजीचा ताळेबंद पुढील प्रमाणे आहे.: **[१०]**

**ताळेबंद**

**३१ मार्च, २०२१ रोजीचा**

| **देयता** | **रक्कम ₹** | **संपत्ती** | **रक्कम ₹** |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | बँक | २५,४०० |
| मीनू | ४६,६०० | ऋणको २८,००० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रेणू | ३८,००० | (–) संशयित | | |
| | | कर्ज निधी | १,९०० | २६,१०० |
| सोनू | ३५,००० | संगणक | | १७,५०० |
| धनको | ४०,९०० | इमारत | | ७०,००० |
| सामान्य निधी | १३,५०० | संयंत्र | | २५,००० |
| | | उपस्कर | | १०,००० |
| | **१,७४,०००** | | | **१,७४,०००** |

१ एप्रिल, २०२१ रोजी सोनू खालील अटींवर व्यवसायातून निवृत्त झाली.

(१) इमारतीचे मूल्य १०% ने वाढवावे.

(२) संपूर्ण ऋणको वसूली योग्य आहेत.

(३) संगणकाचे मूल्य १०% ने कमी करावे.

(४) संयंत्राचे पुनर्मुल्यांकन ₹ २२,५०० आणि उपस्कराचे पुनर्मुल्यांकन ₹ ९,५५० करावे.

(५) सोनूला द्यावयाच्या राशीपैकी ₹ १८,००० NEFT ने देऊन शिल्लक राशी तिच्या कर्ज खात्याला स्थानांतरित केली.

तयार करा :

(अ) नफा–तोटा समायोजन खाते

(ब) भागीदारांचे भांडवल खाते

(क) मीनू आणि रेणू यांचा ताळेबंद

**किंवा**

कावेरीने ₹ ४८,००० च्या वस्तू गौरीला विकल्या. कावेरीने काढलेल्या दोन महिने मुदतीच्या विपत्रास गौरीने त्याच तारखेस स्वीकृती दिली.

कावेरीने ते विपत्र बँकेत वार्षिक १०% कसरीवर वटविले.

देय दिनांकाला विपत्र अनादरीत झाले. गौरीने कावेरीला विनंती केली की, ₹ ८,००० व शेष रकमेवर ११% वार्षिक प्रमाणे ३ महिन्याचे व्याज रोख घ्यावे व

उरलेल्या रकमेचे ३ महिन्याचे विपत्र काढावे. कावेरीने तिची विनंती मान्य केली. परंतु गौरी नादार झाली आणि तिच्या खाजगी संपत्तीतून रक्कम केवळ ४०% प्राप्त झाली.

कावेरीच्या पुस्तकात रोजकीर्द नोंदी तयार करा.

**प्र. ४.** 'अ,' 'ब' आणि 'क' हे भागीदारी संस्थेचे भागीदार असून ते अनुक्रमाने ३ : २ : १ या प्रमाणात नफा–तोटा विभागून घेतात. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च, २०२२ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे होता : **[८]**

**ताळेबंद**
**३१ मार्च, २०२२ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | इमारत | ८०,००० |
| अ | ६०,००० | मोटार कार | ४०,००० |
| ब | ४०,००० | ऋणको | २८,००० |
| क | २०,००० | उपस्कर | ३६,००० |
| धनको | ५६,००० | बँक | २८,००० |
| राखीव निधी | ३६,००० | | |
| | **२,१२,०००** | | **२,१२,०००** |

१ ऑगस्ट, २०२२ रोजी 'क' चा मृत्यू झाला आणि खालील समायोजना करण्यात आल्या :

(१) संपत्तीचे पुनर्मूल्यांकन खालील प्रमाणे झाले :

| | |
|---|---|
| इमारत | ₹ ८८,००० |
| मोटार कार | ₹ ३६,००० |
| उपस्कर | ₹ ३५,००० |

(२) संस्थेच्या ख्यातीचे मूल्य मागील चार वर्षाच्या सरासरी नफ्याच्या दोन पट लावण्यात यावे.

(३) 'क' च्या नफ्यातील हिस्स्याचे आगणन करतांना मागील तीन वर्षाच्या सरासरी नफ्याच्या आधारे करण्यात यावे.

(४) मागील चार वर्षाचा नफा :

₹ २२,०००, ₹ ३४,०००, ₹ २४,००० आणि ₹ ३२,०००

तयार करा :

(अ) नफा-तोटा समायोजन खाते

(ब) 'क' चे भांडवल खाते

(क) 'क' च्या ख्यातीतील हिस्स्याचे आगणन

(ड) 'क' मृत्यू दिनांकापर्यंतचा नफ्याचे कृती कार्य दाखवा.

**किंवा**

बजाज मर्यादित कंपनीच्या ३१ मार्च, २०२१ आणि ३१ मार्च, २०२२ च्या उत्पन्न विवरणाच्या आधारे तुलनात्मक उत्पन्न विवरण तयार करा :

| तपशील | ३१ मार्च २०२१ (₹) | ३१ मार्च २०२२ (₹) |
|---|---|---|
| विक्री | ७,००,००० | ९,००,००० |
| वजा : मालाची मूळ किंमत | ४,००,००० | ५,५०,००० |
| ढोबळ नफा | ३,००,००० | ३,५०,००० |
| वजा : अप्रत्यक्ष खर्च | ६०,००० | ४०,००० |
| कर पूर्व शुद्ध नफा | २,४०,००० | ३,१०,००० |
| वजा : आयकर ५०% | १,२०,००० | १,५५,००० |
| कर आकारणी नंतरचा शुद्ध नफा | १,२०,००० | १,५५,००० |

**प्र. ५.** महालक्ष्मी लि. ने प्रत्येकी ₹ १०० चे २५,००० समभाग विक्रीस काढले. त्यावर खालील प्रमाणे प्रति भाग रक्कम देय आहे : **[८]**

| | |
|---|---|
| अर्जासोबत | ₹ २० |
| आवंटनावर | ₹ ३० |
| प्रथम याचनेवर | ₹ २० |
| द्वितीय आणि अंतिम याचनेवर | ₹ ३० |

२९,००० समभागांकरिता अर्ज आले. अर्जासोबत प्राप्त अतिरिक्त राशीचे समायोजन आवंटनामध्ये करण्यात आले.

१,००० समभागांवरील द्‌वितीय आणि अंतिम हप्ता मागणी सोडून अन्य सर्व भागांवरील येणे असलेली संपूर्ण रक्कम मिळाली.

महालक्ष्मी लि.च्या पुस्तकात आवश्यक किर्द नोंदी करा.

**किंवा**

संगणकीय लेखांकन प्रणालीची वैशिष्ट्ये सांगा.

**प्र. ६.** रामपूर हायस्कूल, रत्नागिरी, ३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाचे प्राप्ती–शोधन खाते आणि अतिरिक्त माहिती पुढील प्रमाणे देण्यात आली आहे. **[१२]**

३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न–खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**प्राप्ती – शोधन खाते**

**३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | | रक्कम (₹) | शोधन | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | | कर्मचाऱ्यांचा पगार | | ४७,१०,००० |
| रोख | २४,००० | | छपाई व लेखनसामग्री | | ६८,००० |
| बँक | ४,००,००० | ४,२४,००० | पुस्तके | | १,७६,००० |
| व्याज | | १,३२,००० | उपस्कर | | |
| देणगी | | १४,००,००० | (१.१.२२ खरीदी) | | १,५६,००० |
| शिक्षण शुल्क | | ३०,००,००० | नाटक खर्च | | १,८०,००० |
| प्रवेश शुल्क | | ९,३०,००० | विद्युत खर्च | | १,३४,००० |
| नाटकापासून प्राप्ती | | २,००,००० | नियतकालिके आणि | | |
| मृत्युपत्राद्‌वारे प्राप्त | | | वर्तमानपत्रे खर्च | | १२,००० |
| देणगी (भांडवल) | | १,२०,००० | शिल्लक (पुढे नेली) | | |
| | | | रोख | १,२४,००० | |
| | | | बँक | ६,४६,००० | ७,७०,००० |
| | | **६२,०६,०००** | | | **६२,०६,०००** |

अतिरिक्त माहिती :

(१)

| तपशील | १ एप्रिल, २०२१ (₹) | ३१ मार्च, २०२२ (₹) |
|---|---|---|
| पुस्तके | १८,००,००० | १७,७६,००० |
| उपस्कर | ६,५२,००० | ६,००,००० |
| इमारत निधी | १६,५४,००० | ? |
| भांडवल निधी | १२,२२,००० | ? |

(२) देणगीच्या ६०% रक्कम ही इमारत निधीकरिता आहे आणि उरलेली रक्कम ही महसूली उत्पन्न आहे असे समजावे.

(३) कर्मचाऱ्यांचा पगार देणे बाकी ₹ १,४०,०००

**प्र. ७.** खालील परीक्षा सूची रसिका आणि दीक्षा यांची असून ३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार खाते व नफा–तोटा खाते व त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा : **[१२]**

**परीक्षा सूची**

**३१ मार्च, २०२२ रोजीची**

| तपशील | नावे शिल्लक (₹) | तपशील | जमा शिल्लक (₹) |
|---|---|---|---|
| स्कंध (१.४.२०२१) | ३०,८०० | भांडवल खाते: | |
| खरेदी | ८०,००० | रसिका | ८०,००० |
| वेतन | ६,८०० | दीक्षा | ८०,००० |
| मजुरी | १०,५०० | विविध धनको | ३०,५०० |
| अधिकार शुल्क | ३,२०० | मुदत ठेवीवर व्याज | १,००० |
| छपाई व लेखनसामग्री | ४,५०० | विक्री | १,२०,००० |
| विविध ऋणको | ४३,००० | | |
| उपस्कर | २०,२०० | | |
| गुंतवणूक | ४०,००० | | |

| | | | |
|---|---|---|---|
| जाहिरात (३ वर्षांकरिता) | ३०,००० | | |
| बुडीत कर्ज | ५०० | | |
| हस्तस्थ रोख | २७,००० | | |
| मुदत ठेव | १५,००० | | |
| | **३,११,५००** | | **३,११,५००** |

समायोजना :

(१) मुदत ठेवींवरील व्याज ₹ १,२०० अप्राप्त आहे.

(२) उपस्करावर वार्षिक ५% ने घसारा आकारा.

(३) विविध ऋणकोवर २.५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधीची तरतूद करा.

(४) संवरण स्कंधाचे लागत मूल्य ₹ ४०,००० असून बाजार मूल्य ₹ ३५,००० होते.

◆◆◆